REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# महिपतीबुवा ताहराबादकरांच्या चरित्रालेखनाच्या प्रेरणा



प्रा.डॉ. एस.डी. लांडे
एस.एम.जोशी महाविद्यालय , पुणे.

## प्रास्ताविक :

संतचरित्रकार महिपतीबुवा हे महाराष्ट्रात होऊन गेलेले एक अलौकिक व्यक्तिमत्व.ज्यांनी संतचरित्रे लिहिता लिहिता तत्कालीन समाज घडवला. जीवनमूल्ये आणि ईश्वरनिष्ठेची पेरणी केली, भक्ती आणि प्रेमाचा बहर आणला आणि समाजाला हरिभक्ती व संतभक्तीचा मार्ग दाखवला. संतजीवनातील सर्व जीवनमूल्ये,नीतिमूल्ये मूर्त झालेली असतात.त्यांचे महत्तम आदर्श समाजासमोर असतील तर त्या आरशात समाज आपले जीवन न्याहळू शकेल.त्यांनी दिग्दर्शित केलेल्या मार्गावरून विश्वासपूर्वक चालत राहिल्यास अभ्युदय आणि निःश्रेयस याची प्राप्ती होईल.दीपस्तंभाप्रमाणे ते या जगात येत असतात.अनेक कारणांनी समाजात भेदभाव निर्माण होऊन समाज विघटीत होत असतो.अशावेळी लोकसंग्रहाचे पुनरूज्जीवन करण्यासाठी संत येत असतात.संत म्हणजे धर्म संकल्पनेचा देश-काल परिस्थितीनुसार पुनरूध्दार करणारे मातृहृदयाचे समाजसुधारक .संत या व्यक्ती नसून एक प्रकारची सामाजिक संस्थाच असते.आधी केले मग सांगितले ही त्यांच्या प्रवोधनाची पध्दत असते.आचार विचारांचे मूळपीठ असणा-या त्यांच्या उपदेशाचा प्रभाव जनमानसावर साहजिक पडतो. म्हणून कविवर्य मोरोपंतांनी संतकथेला कामधेनूची उपमा दिली आहे.यासाठीच संतकवी महिपतीबुवांनी संतचरित्रे लिहिण्याचे ध्येय उराशी धरून धड पडेपर्यंत ते सिध्दीस नेण्याची धडपड केली.या ध्येयवेडया महापुरूषाने संतकथांचे लेखन ही संतसेवा आणि हरिसेवा मानली.संत तुकारामांची कृपादृष्टी लाभलेली असल्यामुळे स्वतःहास निढळवाणा म्हणविणा-या महिपतींचे वारकरी संतमंडळात संतचरित्रकार म्हणून अढळ स्थान आहे.

## चरित्रलेखनाच्या प्रेरणा :

येथ वडील जे जे करिती | तया नाम धर्म ठेविती |
तेचि येर अनुष्ठिती | सामान्य सकळ || (ज्ञाने.**3-185**)

थोर पुरूषांच्या आचार विचारातून धर्म प्रगट होत असतो.म्हणूनच त्यांच्या मार्गावरून चालत राहून जीवनाची सफलता अनुभवता येते.महिपतीबुवांना संतकथांचे एवढे आकर्षण असण्याचे हेच कारण होते.संतजीवनात कर्म, ज्ञान, भक्ती, नीती यांचे मधुर मिश्रण झालेले असते.ही नीतीमूल्ये त्यांच्या जीवनात इतकी एकजीव झालेली असतात की त्यांना संतांपासून वेगळे करता येणे केवळ अशक्यच असते.ते स्वत: संसारसागर तरून जातात आणि इतरांनाही तारून नेतात. महिपतींचा विशेष अट्टाहास यासाठीच आहे.सर्व सामान्य संसारी जीवांना ज्ञानाची योगाची उंच भरारी घेता येत नाही.त्यांच्यात भक्तिभावनेचा उदय होण्यासाठी संतकथांचे आदर्श त्यांचेपुढे ठेवावेत असे महिपतीवुवांना वाटते. ही त्यांच्या चरित्रलेखनाची प्रमुख प्रेरणा आहे.

संतजीवनातील अत्युच्च आदर्श,नीतिमूल्ये समाजासमोर असणे अत्यंत आवश्यक आहे, अशी बुवांची निश्चित धारणा होती.संतचरित्रे वर्णन करताना मी स्वमतीने ग्रंथ लिहित नाही, मी केवळ निमित्तमात्र आहे असे त्यांनी श्रोत्यांना सांगितले आहे.

म्हणाल निजबुद्धीने त्वरीत | आपुले मतीने रचिला ग्रंथ
तरी तैसे नव्हे जी निश्चित | विकल्प चित्त ीन धरावा || भक्तविजय

असे महिपतींनी वारंवार सांगितले आहे. संतांच्या कथा अधीराला धीर देतात,निकराच्या प्रसंगी त्यांच्या निष्ठेची ज्योत जागती ठेवतात म्हणूनच ती चरित्रे जीवी धरावीत अशी श्रोत्यांची विनवणी करणा-या या संतकवीच्या अंगी कमालीची नम्रता होती.

ही चरित्रे ऐकोनी गोमटी |अधीरासी धीर वाटे पोटी
म्हणे थोरथोरांच्या ऐशा गोष्टी | निश्चय संकटी सांडू नये ||

इतर संतांप्रमाणेच महिपतीबुवांची प्रेरणाही श्रध्देची, भावभक्तिची आहे. संतचरित्रे म्हणजे संतजीवनाचे चित्रणच. त्यांचे चरित्र हा त्यांचा उपदेशच असतो. त्यांच्या विचारानुसार जीवन जगणे म्हणजे त्यांचा संग करणे होय. यासाठीच महिपतीबुवांनी संतकथा लिहिणे हे आपले जीवनकार्य आहे असे म्हटले आहे.

महिपतीबुवांच्या दृष्टीने चरित्रलेखन म्हणजे लीलागायन अथवा गुणसंकिर्तन आहे. एखादयाचे चरित्र गाणे म्हणजे त्याचा गौरव करणे अशीच त्यांची भूमिका आहे. परमार्थ ही त्यांची अंतिम जीवननिष्ठा आहे. संत म्हणजे 'अध्यात्मज्ञानाने चोखडी बनलेली परमेश्वराची रूपडी' आहेत. या भावनेने भक्त आणि परमेश्वर यांच्यातील एकरूपत्व शोधून ते भक्तांची चरित्रे गातात. आपले हरपलेले आत्मतत्व संतांच्या सानिध्यात सापडत असल्यामुळे सदैव संतांची चरित्रेच गावी ही त्यांची महत्वाची प्रेरणा आहे.

महिपतीबुवांच्या काव्यलेखनामागील प्रेरणा निखळ भक्तिवादी आहे. या जगात जे अज्ञानी लोक आहेत त्यांच्यासाठी आपण ग्रंथलेखन करीत आहोत. असे म्हणताना जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे. हे त्यांचे ब्रीदही दिसून येते. यासाठीच आपण ही साहित्यसेवा करीत आहोत असा निर्वाळा त्यांनीच दिलेला आहे.

तो कळीच्या प्रातुर्भावे करोनी | प्राणियासी न कळे संस्कृतवाणी
कुग्रामवस्तीसी राहिले प्राणी | तेथे पंडित कोणी असेना || कथासारामृत

आपण हे लेखन लोकांच्या रंजनासाठी नव्हे तर आत्मोद्धारासाठीच लिहित आहोत असे महिपतीबुवा विश्वासपुर्वक सांगतात.

सुरस निरोपण ये ग्रंथी | तेणे आज्ञानाची पुरे आर्ति
ऐकोनिया अध्यात्मसंपत्ती | विरक्त मानती चित्तांत || कथासारामृत

यावरून अज्ञानी लोकांनी ईश्वराच्या भक्तीची आर्ता पुरवण्यासाठीच या ग्रंथाची निर्मिती झाली असे कवी स्पष्ट सांगतो.

## महिपतीबुवा ताहराबादकरांच्या चरित्रलेखनाचे स्वरूप :

संत चरित्रकार म्हणून मराठी वाङमयाच्या इतिहासात संतश्रेष्ठ महिपती ताहराबादकरांचे स्थान अबाधित आहे. त्यांच्याइतकी संत चरित्रे मराठी साहित्यात तरी आजपर्यंत कोणी लिहिली नसतील. **168**महाराष्ट्रातील व **116**महाराष्ट्राबाहेरील अशी एकूण **284** संतांची चरित्रे लिहिण्याचा मान त्यांच्याकडे जातो. संतांची चरित्रे वर्णन करणे हाच आपला जीवन हेतू आहे हे त्यांच्या

न लगे भुक्ती न लगे मुक्ती | मागत नाही धनसंपत्ती
तुझ्या दासांची वर्णीन किर्ती | ऐसे श्रीपती करावे ||

या भक्तलीलामृतातील वचनावरून लक्षात येते. महिपतींचा जन्मच केवळ संतचरित्र वर्णन करण्यासाठी झाला होता असे म्हणल्यास वावगे होऊ नये.

महिपतीबुवांच्या घरात परंपरेनेच विठ्ठलभक्ती चालत आलेली असल्याने ते मोठया धार्मिक प्रवृत्तीचे होते. ग्रंथवाचन आणि संतसहवास हा त्यांचा आवडीचा विषय असून विठ्ठलावर त्यांची फार निष्ठा होती. विठ्ठलाचे प्रेम त्यांच्या चरित्रग्रंथातून साकार झालेले आहे. महिपतीबुवांना तुकारामांकडून स्वप्नात बोध झाल्याचा उल्लेख त्यांनीच केला आहे.

जो भक्तिज्ञानवैराग्यपुतळा | ज्याचे अंगी अनंत कळा
जो सदगुरू तुकाराम आम्हास जोडला | स्वप्नी दिधला उपदेश ||

महिपतीबुवा लहानपणापासूनच पंढरीची वारी करीत असत त्यामुळे मनाची वृत्ती सतत देवाकडे असे. पुढे आपल्या भक्तीत सरकारी कामाचा अडथळा येऊ लागला म्हणून सरकारी नोकरी सोडून ते पुर्णवेळ विठ्ठलभक्तीत रममाण झाले. महिपतींनी **40,000** च्या जवळपास ओवीसंख्या लिहिली. महिपतीबुवांच्या साहित्य वाचनानंतर त्यांना संस्कृतचे उत्तम ज्ञान होते असे लक्षात येते. त्यांच्या ठिकाणी भक्ती,करूणा व अपार निष्ठा होती. त्यांनी ज्ञानेश्वरी,गाथा,वेद,शास्त्रे,व पुराणे यांचा गाढा अभ्यास केल्याचे देखील जाणवते. भक्तविजय,संतलीलामृत,भक्तलीलामृत व संतविजय हे चरित्रग्रंथ त्यांनी इ.स. **1762** ते**1789** या **27** वर्षाच्या काळात लिहिले याशिवाय त्यांनी पांडुरंगस्तोत्र, मुक्ताभरणव्रतकथा, गणेशपुराण, तुलसीमाहात्म्य, अनंतव्रतकथा, पांडुरंगमहात्म्य,दत्तात्रयजन्म, ऋषीपंचमीवतकथा,कथासारामृत, स्फूट अभंग व पदे इ. स्फुट रचनाही लिहिली आहे.

भक्ती सुखासाठी संतकृपेचीच आवश्यकता असते अशी महिपतीबुवांची धारणा होती. म्हणूनच संतजीवने जवळून न्याहळण्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यात खुप भ्रमंती केली. संतचरित्राच्या लेखनात त्यांची प्रतिभा, व्युत्पन्नता आणि परिश्रम यांचे मनोहर दर्शन घडते. जगद्गुरू तुकारामांच्या अभंगवाणीप्रमाणे महिपतींची कविता सामान्य माणसाच्या हृदयाचा ठाव घेऊ शकली याचे हेच मुख्य कारण आहे. त्यांच्या कवितेला भावनेचा सुगंध आणि ओलावा प्राप्त झालेला आहे. संसारी जीवनाविषयीची उद्धाराची तळमळही आहे.

संत आणि भक्त यांच्याबद्दल वाटणा-या आदरापोटीच महिपतीबुवांनी या ग्रंथांचे लेखन केले आहे. महिपतीबुवांचा पहिला चरित्रग्रंथ 'भक्तविजय' जरी प्रथम नाभाजी व उद्धव चिदघन यांच्या आधाराने लिहिला आहे असे वाटत असले तरी पुढील संतांच्या चरित्रांत त्यांनी हा आधार सोडून दिलेला दिसतो. विठ्ठलावरील निष्ठा संतांबद्दलचा आदर धर्मपरायण मनोवृत्ती आणि प्रासादिक वाणीचा अंखड प्रवाह हे त्यांच्या संतचरित्रकथनाचे मुख्य गुणविशेष होत. संतांचे पवाडे वर्णन करणे हे त्यांचे ब्रीद आहे. सा-या ग्रंथभर 'ग्रंथ वदविता रूक्मिणीपती | मी तो मंदमती अज्ञान' अशी भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. भक्तविजय या ग्रंथात **57** अध्याय असून **9916** इतक्या ओवीतून नामदेव, ज्ञानदेव, दामाजी, भानुदास, एकनाथ,तुकाराम,बोधलेबुवा,गणेशनाथ इ. संतांची चरित्रे या ग्रंथात आली असून उद्धवचिद्घनाचे आख्यानही शेवटी सांगितले आहे. चरित्रगायन म्हणजे भक्ती असे मानूनच या ग्रंथाचे लेखन झालेले दिसून येते.

'संतलीलामृत' या ग्रंथात **35** अध्याय असून **5359** इतक्या ओवीसंखेतून अनेक संतांची चरित्रे आलेली आहेत. विशेषतः 'भक्तविजय' या ग्रंथात ज्यांची चरित्रे आली नाहीत त्यांची चरित्रे 'संतलीलामृता'त आली आहेत. 'आधील मागील कोणते संत| हे तरी मी नेणोचि सत्य' अशी कबुली दिलेली आहे. निरनिराळे ग्रंथ पाहून, माहिती जमवून, आधार शोधून आपण ही चरित्रे लिहिली आहेत, निव्वळ या भाकडकथा नाहीत, असे महिपतीबुवा मधूनमधून श्रोत्यांना बजावीत आहेत. संतलीलामृतात जालंधर, कानिफनाथ, गोपीचंद, मत्स्येंद्रनाथ, भतुहरी, ज्ञानेश्वर, नामदेव, सोपानदेव, नागनाथ, विठ्ठलदास, देवमुरारी, जयमल्ल, पिपाजी, परशुराम, गोविंददास,चोखामेळा, तुळशीदास,सखू इ. नाथ,संत व भक्तांची चरित्रे आलेली असून संतमहिमा, संतसहवास,भक्तिमहिमाही सांगितलेला आहे. वारकरी संतांप्रमाणेच काही नाथ संप्रदायातील महत्वाची संतचरित्रेही या ग्रंथात आलेली आहेत. नाथांच्या कथा मोठ्या रंजक आणि मार्गदर्शक आहेत. या कथांच्या रूपाने महिपती नाथ संप्रदायाचे स्वरूपही समाजासमोर आणतात. वारकरी संप्रदायापूर्वी नाथ संप्रदाय महाराष्ट्रात मोठा नावलौकिक मिळवून होता. स्वत: ज्ञानेश्वरही नाथ संप्रदायी होते. संतचरित्राचे वर्णन करताना उपमा व अलंकाराचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला आहे. यातील वर्णने सुंदर असून भाषा रसाळ आहे.

'भक्तलीलामृत' हा ग्रंथ महिपतीबुवांचा सर्वात मोठा आणि डौलदार ग्रंथ म्हणून ओळखला जातो. ग्रंथात **51** अध्याय असून **10794** इतकी ओवीसंख्या आहे.

संतलीलामृतसार |त्यांतही चरित्रे वर्णिली फार
परि आणिक कथा राहिल्या अपार | मग रूक्मिणीवर आज्ञापी माते ||

म्हणूनच 'भक्तलीलामृत जाण| ग्रंथ आरंभिला दुस-याने' अशी या ग्रंथाची प्रेरणा महिपतीबुवांनी स्वतः सांगितली आहे. या ग्रंथात चांगदेव,ज्ञानेश्वर,नरसिंह सरस्वती,तुकाराम,एकनाथ,भानुदास, संतोबा पवार, विठ्ठल पुरंदर,माणकोजी बोधला इ. संत व भक्तांची चरित्रे बुवांनी आपल्या प्रासादिक भाषेत रंगवलेली आहेत. या ग्रंथात चांगदेव, एकनाथ व तुकाराम यांची चरित्रे प्राधान्याने लिहिलेली

आहेत. उरलेल्या संतांची चरित्रे संक्षेपाने वर्णन केलेली आहेत. शोधक बुद्धी,पांडित्य,कवित्वशक्ती,भक्तीचा जिव्हाळा, भाषेची सुबोधता व प्रसन्नता इ. दृष्टींनी या ग्रंथाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

'संतविजय' हा महिपतींचा अपुर्ण ग्रंथ. याचे सव्वीस अध्याय असून एकूण ओवीसंख्या **4628** इतकी आहे. यात प्रामुख्याने रामदास व बाबाजी गोसावी यांची चरित्रे आलेली आहेत. पहिल्या **25** अध्यायात समर्थ रामदासांचे चरित्र त्यांच्या पूर्वपीठिकेपासून समाधिप्रसंगापर्यंत वर्णन आलेले आहे. **26**व्या अध्यायात बाबाजी गोसावी यांचे चरित्र आलेले आहे. या ग्रंथाचे **27** अध्यायाची एक प्रत उपलब्ध झालेली असून **27** वा अध्याय सरदार खं. चि. मेहेंदळे यांनी भा. इ. स. मंडळाच्या त्रैमासिकात छापलेला आहे. याची ओवीसंख्या **188** इतकी असून यात जमालशा,प्रेमानंद व बयाबाई यांच्या कथा आलेल्या आहेत. हा अध्याय महिपती रचित मानला तर 'संतविजय' पुर्ण उपलब्ध आहे असे ठरेल. एखादया ग्रंथकाराकडून अपूर्ण राहिलेल्या ग्रंथाची पूर्ती करण्याचा प्रयत्न पुढील लेखकांकडून झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. या अध्यायाचा प्रकारही तसाच असावा,असे वाटते.

वरील चार चरित्र ग्रंथाच्या बरोबरीने महिपतींनी 'कथासारामृत' हा एक **7200** ओव्यांचा ग्रंथ लिहिलेला आहे. परंतु उपलब्ध झालेल्या हस्तलिखितात **6883** एवढयाच ओव्या आहेत. अनेक पौराणिक कथा यात सोदाहरण वर्णिल्या आहेत. या ग्रंथात **36** अध्याय असून प्रत्येक अध्यायात सुमारे **200** ओव्या आहेत. यातील कथा पद्मपुराण, वायुपुराण, स्कंधपुराण, नानापुराणे यातून घेतल्याचे कवी प्रत्येक अध्यायाच्या शेवटी सांगतो. याशिवाय महिपतीबुवांनी पांडुरंगस्तोत्र, मुक्ताभरणव्रतकथा, गणेशपुराण, तुलसीमाहात्म्य, अनंतव्रतकथा, पांडुरंगमहात्म्य, दत्तात्रयजन्म, ऋषीपंचमीव्रतकथा, कथासारामृत, स्फुट अभंग व पदे इ. स्फुट रचनाही लिहिली आहे. पांडुरंगस्तोत्र या प्रकरणात त्यांनी पांडुरंगाला पत्र लिहिले असून त्यात महिपतीबुवांचे आत्मचरित्र आले आहे. पांडुरंगमहात्म्य या प्रकरणात पंढरपूर, त्याच्या परिसरातील मंदीरे, क्षेत्रस्थळे, चंद्रभागा याविषयी कथा सांगितल्या आहेत.

## समारोप :

महिपतीबुवा ताहराबादकर यांचे साहित्य असे वैविध्यपुर्ण आहे. महिपतीबुवा हे संत असून कवी होते. संतचरित्रे गाणारे कवी होते. राजाचा जसा राजकवी तसे संतांचे संतकवी होते. त्यांनी केलेल्या एकूण लेखनात संत आणि भक्तांची चरित्रेच मोठ्या प्रमाणात आहेत. महिपतीबुवांची विठ्ठलावरील निष्ठा, संताबद्दलचा आदर, धर्मपरायण मनोवृत्ती आणि प्रासादिक वाणीचा प्रचंड प्रवाह हे त्यांच्या संतचरित्रकथनाचे मुख्य गुणविशेष होत. नाथ संप्रदायातील काही नाथांची चरित्रे आणि महाराष्ट्राबाहेरील काही चरित्रेही यात आहेत. संतकथा गाणे म्हणजेच परमेश्वराची भक्ती करणे तसेच आदर्श भक्तांची भक्ती गाणे म्हणजेच भक्ती करणे या प्रेरणेनेच हे लेखन झालेले दिसून येते. संतचरित्रे हा त्यांच्या जीवनाचा ध्यासच झाला होता. या संतचरित्रांच्या रूपाने त्यांनी समाजाला नीतीचा व भक्तीचा आदर्श मार्ग दाखवला. त्यांची भक्तचरित्रेही तितकीच भक्तीरसाने ओथंबलेली आहेत. गावोगाव प्रवास करून सर्व संतांची व भक्तांची माहिती एकत्र करणे आणि ती कवितेच्या रूपात शब्दबद्ध करणे हे महान कार्य महिपतीबुवांनी केले. महाराष्ट्रात गावोगाव या ग्रंथांचे अत्यंत भक्तीभावाने वाचन आणि श्रवण केले जाते.

## 1. संदर्भ व टीपा :

**1**. बोरगावकर व. रा., 'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे **1978**, पृ. **161**
**2**. देवळे श. रा, 'भक्तविजय', आदर्श विद्यार्थी प्रकाशन पुणे **2004** पृ. **8**
**3**. आवलगावकर रमेश, 'कथासारामृत', देवगिरी प्रकाशन शिरूर पृ. **171**
**4**. फडके वि. के., 'भक्तलीलामृत', यशवंत प्रकाशन **1978**, पृ. **1**
**5**. ढेरे रा. चि., 'संतांच्या चरित्रकथा', पुष्पक प्रकाशन पुणे **1967**, पृ. **75**